


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १७९ ●रविवार, दि. २८ सप्टेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

## नवरात्र उत्सव

**सातवी माळ**



सप्तमीचे दिवशी सप्तशृंग
गडावरी हो। तेथे तु
नांदशी भोवती पुष्पे
नानापरी हो। जाईजुई
शेवंती पूजा रेखियली
बरवी हो। भक्त संकटी
पडता झेलुन घेशी
वरचेवरी हो ॥७॥
उदो बोला उदो अंबबाई
माऊलीचा हो।
उदोकर गर्जती काय
महिमा वर्णू
तिचा हो ॥

# बीड जिल्ह्यात पावसाचा कहर सुरुच



# १८ महसूल मंडलात अतिवृष्टी, नद्यांना पूर

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्याला रेड अलर्ट जाहीर करण्यात आला आहे. मध्यरात्री पासून सुरू असलेला पाऊस सकाळपर्यंत सुरू होत. दोन तासांच्या विश्रांतीनंतर पुन्हा एकदा ढगांच्या गर्जनेसह जोरदार पावसाला सुरुवात झाली आहे. नदी-नाल्यांना पूर आला असून नदी काठच्या नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. बीड जिल्ह्यात पावसाचा कहर सुरू आहे. जिल्ह्यातील बहुतांश भागात शुक्रवारी मध्यरात्री पासून जोरदार पाऊस कोसळत आहे. अनेक नद्यांना पुन्हा पूर आला असून रस्ते, मार्ग पाण्याखाली गेले आहेत. त्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. बिंदुसरा नदी तुडुंब भरून वाहत आहे. मांजरा, माजलगाव, सिंधफणा प्रकल्पातून पुन्हा विसर्ग वाढवला आहे. मुसळधार पावसामुळे शहरात पाणी साचू लागले आहे. जिल्ह्यातील अनेक भागात शुक्रवारी जोरदार पाऊस झाला. शनिवारी सकाळी पावसाचा जोर ओसरला असला तरी संततधार सुरू आहे. त्यामुळे नद्यांना पूर आला आहे. कुंडलिका, बिंदुसरा, सिंदफना, मांजरा, नद्यांना पूर आला असून अनेक गावाचा संपर्क तुटला आहे. जिल्ह्यातील जनजीवन विस्कळित झाले आहे. दरम्यान, आता मोठ्या प्रकल्पातून पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आला आहे. मांजरा, माजलगाव, प्रकल्पातून विसर्ग सुरू केला आहे. प्रशासनाने नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. धारूर तालुक्यातील गांवदरा गावात जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर असलेला पूल सततच्या मुसळधार पावसाने वाहून गेल्याने अर्ध्या गावाचा संपर्क तुटला आहे.

● बीड जिल्ह्यातील तब्बल अठरा महसूल मंडलात रात्री अतिवृष्टी झाली आहे. यात बीड तालुक्यातील बीड ७३.८ मीमी, पाली ८२.३, पेंडगाव ७३.८, मांजरसुंबा ६६.३, पाटोदा तालुक्यातील पाटोदा ७१.५, दासखेड ८६.०, थेरला ११४.५, माजलगाव तालुक्यातील नित्रुड ७०.०, अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदुर ८४.३, उजनी ७३.८, केज तालुक्यातील केज ७४.३, हनुमंत पिंपरी ७७.३, होळ ७७.५, परळी तालुक्यातील परळी ६८.८, धर्मपुरी ७३.८, नागपूर ७३.०, धारूर तालुक्यातील धारूर ८४.३, तेलगाव ८५.० मीमी एवढ्या पावसाची नोंद झाली आहे


## धीर खचलेल्या शेतकऱ्याने पुरात उडी घेऊन केला जीवन संपवण्याचा प्रयत्न



**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील दैठणा गावातील एका शेतकऱ्याने आपले उभे पीक पाण्यात जाऊन स्वप्नांची राखरांगोळी झाल्याने धीर खचल्यामुळे ओढ्याच्या पुरात उडी मारून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मात्र एकाच्या समय सूचकतेमुळे अनर्थ टळला आहे. या बाबतची माहिती अशी की, मागील आठवड्या पासून बीड जिल्ह्यात आणि केज तालुक्यात सुरू असलेल्या संततधार आणि मुसळधार ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड शहरातील नागरिकांनी सतर्क राहावे : डॉ.सारिका क्षीरसागर



**बीड । प्रतिनिधी**

दिवसभर झालेल्या संततधार पावसामुळे बीड शहरात शनिवारी (दि.२७) सर्वत्र पाणीच पाणी झाले होते. शहरातील नाळवंडी नाका, गांधी नगर, आदित्य कॉलेज परिसर, लोणार ▶▶ उर्वरित पान २ वर

**● नागरिकांसाठी हेल्पलाइन जारी**

आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत मिळावी यासाठी डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या संपर्क कार्यालयातून हेल्पलाइन सुरू करण्यात आली आहे. ग्रामीण भागासाठी ९६२३८७७५९९ व ७३५०५१०००९ आणि शहरी भागासाठी ९४२२६१६६६२, ८०८७५०८२६७, ८९९९२९२८० या हेल्पलाइन नंबरवर किंवा जिल्हा प्रशासनाच्या आपत्कालीन क्रमांक ०२४४२-२९९२९९ यावर संपर्क करावा, असे आवाहन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे.

## शहरातील पूरग्रस्तांना आ.संदीप क्षीरसागरांच्या माध्यमातून संकटाच्या काळात मदत

**संकटाच्या काळात जनतेला वाऱ्यावर सोडणार नाही ; मदतीचा हा छोटासा प्रयत्न : संदीप क्षीरसागर**

### लेंडी नाला, मोमीनपुरा भागातील नागरिकांना अन्न-धान्य वाटप

**बीड । प्रतिनिधी**

शहरात झालेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील लेंडी रोड आणि मोमीनपुरा भागातील घरांमध्ये पाणी घुसल्याने घुसल्याने संसार उपयोगी वस्तूंचे नुकसान



झाले. घरातील सर्व साहित्य वाहून गेले आहे. त्यामुळे स्थानिक भागातील नागरिकांना आ.संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते स्वस्त धान्य दुकान क्र.२७ येथे अन्न धान्य वाटप करण्यात आले. या अतिवृष्टीच्या काळात नदी काठच्या लोकांनी सतर्क राहून काळजी घेण्याचे आवाहन देखील संदीप भैय्या यांनी नागरिकांना केले आहे. संदीप भैय्या अतिवृष्टीच्या काळात नागरिकांना मदत आणि धीर देताना पाहावयास मिळत असून ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड जिल्ह्यातील मच्छिमार भोई प्रति कुटुंबांना 50 हजार रुपये नुकसानभरपाई द्यावी: वसंत परसे

**पालकमंत्री अजितदादा मच्छिमार भोई समाजाकडे लक्ष देतील का ?**



**माजलगाव । प्रतिनिधी**

मराठवाड्यात ढगफुटी सारख्या पावसाने थैमान घातलं असून, गोदावरी सिंधफणा वा अन्य छोट्या मोठ्या नद्यांनी पात्र सोडून एक ते दीड किलोमीटर पाण्याने वळण घेऊन जनजीवन विस्कळीत झाले ▶▶ उर्वरित पान २ वर



*शिरूर (कासार) तालुका अतिवृष्टीग्रस्त ग्रामीण भागातील मौजे ब्रह्मनाथ येळंब येथील पूरग्रस्तांना सौं चंपावती काकू पानसंबळ यांनी मदत म्हणून जीवनावश्यक वस्तूंचे किराणा किटचे वाटप करताना रोहित पानसंबळ, राहुल खोपडे, विनायक थोरात आणि मित्रपरिवार...यावेळी सरपंच मा. श्री. महेश ढाकणे आणि ग्रामस्थ मंडळी उपस्थित राहिले.*

## प्रशासनाचा भोगंळ कारभार ; म्हाळस जवळा येथील पर्जन्य यंत्र बंद : राजेंद्र आमटे

**धो-धो पाऊस पडत असतानाही अहवाल रिकामा (-)का ?**

**बीड । प्रतिनिधी**

संपुर्ण जिल्ह्यात अतिवृष्टी होत असताना बीड तालुक्यातील म्हाळस जवळा महसूल मंडळ मधील पर्जन्यमापक यंत्र बंद का? , म्हाळस जवळा महसूल मंडळ मधील पर्जन्यमापक यंत्र बंद असल्याने अतिवृष्टीची नोंद योग्य येत नाही. ▶ उर्वरित पान २ वर



## आंदोलनाची उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी घेतली दखल

### धानोरा रस्त्याच्या कामाला अखेर मंजुरी

**बीड । प्रतिनिधी**



अनेक वर्षांपासून दुर्लक्षित असलेल्या आणि हजारो नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी थेट जोडलेल्या अहिल्यानगर रोड ते आ.धानोरा रोड पालवन चौक सिमेंट रस्ता कामाला अखेर मंजुरी ▶▶ उर्वरित पान २ वर

## दूध उत्पादकांनी भ्रूण प्रत्यारोपण या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादकता वाढवावी : आ.सुरेश धस

**परराज्यातील प्रजातीबाबत युवकांनी सजग राहून फसवणूक टाळावी: अरविंद पाटील**



**आष्टी । प्रतिनिधी**

दूध उत्पादक शेतकऱ्यांनी नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून भ्रूण प्रत्यारोपण या नवीन अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपल्याच गोठ्यात नवीन प्रजाती निर्माण करून जास्तीत जास्त दूध उत्पादन होईल यासाठी प्रयत्न करावेत... असे प्रतिपादन आ.सुरेश धस यांनी केले.

तसेच महाराष्ट्रातील तरुण दूध उत्पादन व्यवसायाकडे येत आहेत परंतु त्यांनी सोशल मीडियावरील माहितीवरून परराज्यातून गाई म्हशींच्या बाबत या माहिती आधारे आर्थिक गुंतवणूक करू नये त्यातून फसवणूक होण्याचे अनेक उदाहरणे घडली आहेत त्यामुळे त्यांनी सजग राहून फसवणूक टाळावी.. असे आवाहन कोल्हापूर येथील वाय. टी.पाटील डेअरी फार्म चे संचालक अरविंद पाटील यांनी केले. आष्टी तालुका दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संघ यांचे वतीने आयोजित दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या मेळाव्यामध्ये मार्गदर्शन करताना आमदार सुरेश धस आणि अरविंद पाटील बोलत होते. या वेळी प्रास्ताविक डॉ. जालिंदर वांढरे,डॉ. मंगेश ढेरे पशुधन विकास अधिकारी यांनी केले.यासह पशु प्रजननातील अद्यावत तंत्रज्ञान, भ्रूण प्रत्यारोपण याबाबत डॉ. विष्णू जवणे ( पशुधन विकास अधिकारी पुणे) ▶▶ उर्वरित पान २ वर

## मौजे जोला गावावरील संकट तलाठी रविंद्र गायकवाड यांच्या सतर्कतेमुळे टळले



**केज । प्रतिनिधी**

शनिवार दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजी केज तालुक्यातील मौजे जोला शिवारातील रक्ताळीचा माळ परिसरातील पाझर तलाव फुटणार ▶▶ उर्वरित पान २ वर



# देवेंद्र सरकारवर शेतकऱ्यांचा 'विश्वास' का राहिला नाही?

५ मे २०२५ पासून महाराष्ट्रात सगळीकडे सातत्याने पाऊस पडत आहे. नद्या,नाले भरून वाहत आहेत. छोटी,मोठी धरणे, मध्यम प्रकल्प तुडुंब भरली आहेत. नदी,नाल्याकाठच्या जमिनी पूर्णतः खरडून गेल्या आहेत.सततच्या पावसामुळे जमिनी गारठल्याने रब्बी पिकांसाठी पोषक वातावरण तयार होणार का? ऊस वगळता सर्व पिकांची 'दाणादाण' उडाली आहे. पावसाच्या तडाख्याने शेतकरी उध्वस्त झाले असून हतबल बनले आहेत. विधानसभा निवडणुकीपूर्वी दिलेल्या आश्वासनापासून देवेंद्र सरकारने पुर्णपणे घुमजाव केले आहे.तथाकथित विरोधी पक्षावरही शेतकऱ्यांचा भरवसा राहिला नाही.

२५ सप्टेंबर २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार मराठवाड्यातील लातूर,धाराशिव,बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते.अति पावसामुळे झालेल्या नुकसानीला एकरी किती पैसे देणार?शेतकऱ्यांची कर्जमुक्ती का देत नाही? अशी विचारणा शेतकऱ्यांनी केली. लातूर जिल्ह्यातील औसा येथील भारत कोळी या दहा एकर जमीन खरडून गेलेल्या सोयाबीनच्या शेतकऱ्याने देवेंद्र फडणवीसांना घाम फोडला. भारत कोळींच्या प्रश्नाचे उत्तर देण्याऐवजी तुम्ही राजकारण करीत आहात?असा अजब आरोप देवेंद्र फडणवीसांनी भारत कोळी यांच्यावर केला.अजितदादा पवार यांनी पैशाचे सोंग आणता येत नाही असे कारण शेतकऱ्यांना सांगितले. एकनाथ शिंदे यांनी शेतकऱ्यांना वाटण्यासाठी आणलेली आवश्यक वस्तूंची पाकिटे शेतकऱ्यांनी नाकारुन सरसकट कर्जमुक्ती कधी देणार? अशी विचारणा केली. २३७ आमदारांच्या भक्कम पाठिंब्यावर चाललेल्या सरकारला शेतकऱ्यांनी कानफटात मारली आहे.

भ्रष्टाचाराला मोकळीक : सन २०१४ साली देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचे पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले,तेव्हा त्यांनी सरकारी नोकरदारांवर वचक ठेवण्यासाठी 'सेवा हमी विधेयक' आणण्याची घोषणा केली होती.सन २०२४ साली तिसऱ्यांदा मुख्यमंत्री पदाची शपथ घेऊन सुद्धा देवेंद्र फडणवीसांना सरकारी नोकरदारावर वचक ठेवण्यासाठी 'सेवा हमीचा कायदा' करता आला नाही.मात्र शेतकऱ्यांची लूट करणारे साखर कारखाने, सूतगिरण्या,दूध संघ, बाजार समित्या, बँका, पतपेढ्या, देशी दारूची दुकाने, रेशनची दुकाने आणि शिक्षणसंस्थांना भ्रष्टाचारासाठी मोकळे रान मिळाले. शेतकऱ्यांना लुबाडून या संस्थांनी नवे विक्रम नोंदविले.गोवंश हत्याबंदी,वन्य प्राणी संरक्षण कायदा कठोरपणे राबवून शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले.पोलिस,महसूल, कृषी, सहकारी अधिकाऱ्यांना भ्रष्टाचाराची नवी कुरणे तयार केली. शेतकऱ्यांकडून सक्तीची कर्जवसुली केली.कर्जमाफी आणि पीक विमा योजनेमध्ये कसलीही पारदर्शकता ठेवली नाही.परिणामी शेतकऱ्यांच्या आत्महत्या मध्ये मोठी वाढ झाली आहे.शेतकऱ्यांच्या विरोधात काँग्रेसप्रमाणेच देवेंद्र सरकारनेही उघडपणे मोहीम राबविली.

सन २०१७ साली महाराष्ट्रातील शेतकरी संघटनांनी एकत्र येऊन देवेंद्र सरकारविरोधात रघुनाथदादा पाटील यांच्या नेतृत्वात 'कर्जमुक्ती' साठी अभूतपूर्व लढा दिला.११ जून २०१७ रोजी छत्रपती शिवाजी महाराज कर्जमाफी योजना देवेंद्र सरकारने लागू केली.या योजनेस पात्र असलेल्या सुमारे ६ लाख शेतकऱ्यांना अजूनही दीड लाख रुपये कर्जमाफी मिळाली नाही.या विरोधात सन २०२२ साली शेतकरी संघटनेचे उपाध्यक्ष ड. अजित काळे यांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली. न्यायालयाने सुमारे ५ लाख ९० हजार शेतकऱ्यांना ६ हजार कोटी रुपये देण्याचे आदेश दिले. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना विधानसभेत त्यांनी याबाबत उच्च न्यायालयाला आश्वासन दिले.आजतागायत त्याची पूर्तता केली नाही.अब्दुल सत्तार, धनंजय मुंडे या कृषीमंत्र्यांनी पिक विमा योजनेत प्रचंड अनियमितता केली. अनेकांनी बोगस पिक विमा भरून कोट्यावधी रुपये लाटले. माणिकराव कोकाटे यांच्या कृषिमंत्री पदाच्या कार्यकाळात पिक विमा योजनेतील शेतकऱ्यांच्या बाजूचे सर्व 'ट्रिगर' वगळण्यात आले. शेतकऱ्यांनी या सरकारवर कसा भरवसा करायचा?

शेतीमाल खरेदीत भ्रष्टाचार: नाफेड,FCI,CCI,मार्केटिंग फेडरेशन या संस्थांनी सोयाबीन,भात, हरभरा, ज्वारी, कापूस,कांदा आदी. शेतीमालाच्या खरेदीत प्रचंड अफरातफर केली.मागील दहा वर्षांपासून साखर कारखाने वीज, इथेनॉल,देशी-विदेशी दारु,मळी, साखर, उछऋगॅस आदी. विविध उत्पादने करून प्रचंड नफा कमवीत आहेत.तरिही शेतकऱ्यांची ऋछझ साखर कारखाने बुडवितात. शेतकऱ्यांचे पैसे बुडविणाऱ्या साखर कारखान्यावर कारवाई नाही. महाराष्ट्रातील सर्वच्या सर्व ३०५ बाजार समित्या मधून शेतीमालाला चडझ दिली जात नाही. कुठल्याही बाजार समितीवर कारवाई केल्याचे ऐकिवात नाही.जागतिक आरोग्य संघटनेने (थकज) भारतात दररोज केवळ १४ कोटी लिटर दुधाचे संकलन होते,मात्र दुधाचा दैनंदिन वापर ६४ कोटी लिटर असल्याचे अहवालात स्पष्ट केले आहे. दररोज ५० कोटी लिटर नकली दूध विकणाऱ्या दूध संघांवर कारवाई करण्याची हिम्मत देवेंद्र सरकारने अजून दाखविली नाही.

हरिण, मोर, नील गायी, भटके कुत्रे, डुक्कर,बिबट्यासारखे हिंस्र प्राणी यांनी उच्छाद मांडला आहे. नुकतेच विदर्भातील गोंदिया जिल्ह्यात मिलिटरी कॅम्पमधून जवानाच्या दोन महिन्याच्या मुलीला बिबट्याने अंगणातून उचलून नेले. भटक्या कुत्र्यांनी शाळेत जाणारी लहान मुले फाडून टाकल्याच्या अनेक घटना महाराष्ट्रात घडल्या आहेत.ऊस तोडायला गेलेल्या कामगारांची लेकरे बिबट्याने पळवून नेली आहेत.माणसापेक्षा हिस्त्र प्राण्यांचे जीवन सुखमय बनले आहे. महापालिका, नगरपालिका जिल्हा परिषदचे शिक्षक,कर्मचारी फुकट पगारी उचलीत आहेत.बोगस शालार्थ आय.डी. बनवून नोकऱ्या मिळविलेल्या शिक्षकांना देवेंद्र सरकारच्या काळात अभय मिळाले आहे. भ्रष्टाचार केलेल्या सरकारी कर्मचाऱ्यावर कारवाई दाखवा आणि बक्षीस मिळवा. अशी परिस्थिती आहे. जिल्हा परिषद, पंचायत समित्या ही कार्यालय भ्रष्टाचाराचे अड्डे बनले आहेत. शेती लुटीचा कारभार उघड्या डोळ्यांने सगळे पहात आहेत. विधानसभा निवडणुकी वेळी झालेले गैरप्रकार संपूर्ण महाराष्ट्राने अनुभवले आहेत.अति पावसाने फटका बसलेल्या शेतकऱ्यांचा आता देवेंद्र सरकारवर कसलाही विश्वास राहिला नाही.



– कालिदास आपेट,
कार्याध्यक्ष,शेतकरी संघटना म.रा.
सचिव,भारतीय किसान संघ-परिसंघ
नवी दिल्ली. ९८२२०६१७९५

◆ पान १ वरून पुढे...

## धीर खचलेल्या...

पावसाने शेतातील पिके सडून गेली असल्याने शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण पसरले आहे. शेतात केलेला खर्च आणि त्यातून निघणाऱ्या उत्पन्नावर शेतकऱ्याचे सर्व नियोजन असते. त्या सर्व स्वप्नांची धूळधाण झाली असल्याने अनेकांचे धीर खचले आहेत. केज तालुक्यातील दहिटना येथील खंडू हरिचंद्र मुळे या शेतकऱ्याच्या शेतातील ऊस, सोयाबीन या पिकात पाणी गेल्याने पीक हातचे गेले आहेत. पेरणी, खत औषधी यासह मशागतीसाठी झालेले कर्ज आणि मेहनत वाया गेली. त्यामुळे आता सावकार आणि बँकेचे कर्ज कसे फेडणार? या विवंचनेने शेतकऱ्यांचा आत्मविश्वास खचून नैराश्य आले आहे. त्या नैराश्यातून खंडू मुळे या शेतकऱ्याने दि. २७ सप्टेंबर रोजी दुपारी नाव्होली कडून दहिटन्याकडे वाहत असलेल्या ओढ्याला आलेल्या पुरात उडी मारून आत्महत्येचा प्रयत्न केला. मात्र त्यांची चलबिचल पाहून ते ओढ्याच्या प्रवाहाकडे जात असताना त्या ठिकाणी असलेल्या राजाभाऊ कातमांडे यांनी पळत जाऊन खंडू मुळे यांना धरून त्यांना समजावून रोखण्याचा प्रयत्न केला. तरी देखील ते ऐकून घेण्याच्या मनस्थितीत नव्हते. परंतु राजाभाऊ कातमांडे यांच्या समयसूचकते मुळे खंडू मुळे यांचे प्राण वाचलेले आहेत. मला पाच एकर जमीन असून आता सर्व काही गेल्यामुळे काही शिल्लकच उरले नाही तर जगून तरी काय उपयोग असे काळीज हेलावणारी प्रतिक्रिया खंडू मुळे यांनी प्रतिनिधीशी फोनवरून बोलताना दिली. आता कोणतीही वाट न बघता सरकारने शेतकऱ्याला विनाविलंब मदत द्यावी :- पूर आणि अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अपरिमित नुकसान झालेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मायबाप सरकारने हेक्टरी एक लाख रु. मदत द्यावी कारण पेरणी अंतर मशागत आणि खत, बी-बियाणे, फवारणी औषधे यांचा खर्च हेक्टरी ५० हजार रु. च्या आसपास आहे.

## बीड शहरातील ...

पुरा, जुना दगडी पूल आदी भागात पाणी साचून नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी विविध भागांची पाहणी करून नागरिकांच्या भेटी घेतल्या व त्यांना धीर दिला. त्यांच्या सूचनेनंतर तहसील व नगरपरिषद प्रशासनाने गतीने मदतकार्य पोहोचविले. तसेच, घरांच्या नुकसानीचे पंचनामे सुरू करण्यात आले आहेत. बीड शहरातील गांधीनगर भागातील अनेक घरात पाणी शिरले. त्याठिकाणी जाऊन डॉ.सारिका क्षीरसागर यांनी नागरिकांची भेट घेतली. त्यांच्या सूचनेवरून तहसील व नगरपरिषद प्रशासनाने तेथील नागरिकांना आदित्य कॉलेज परिसरात सुरक्षितस्थळी स्थलांतरित केले. या नागरिकांच्या निवासासह जेवणाची सोय करण्यात आली त्यांना धनी दिले जाणार आहे. ही कार्यवाही नायब तहसीलदार सुहास हजारे यांच्या उपस्थितीत मंडळ अधिकारी अनिल तांदळे यांनी केली असून त्या भागातील ३३ घरांच्या नुकसानीचे पंचनामे केले आहेत. जालना रोडलगतच्या नालीची समस्या ना.अजित पवार यांच्याकडे मांडणार: बीड शहरातील जालना रोड भागातील सर्व दुकानांमध्ये पाणी शिरल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. तत्काळ घटनास्थळी जाऊन मुख्याधिकाऱ्यांशी संपर्क साधून आवश्यक उपाययोजना करण्यास सांगितले. याठिकाणी वारंवार पाणी साचत असल्याने कायमस्वरूपी तोडगा निघावा यासाठी पालकमंत्री ना.अजित पवार यांना कळविण्यात येणार आहे. पांगरी रोड भागातील वीजपुरवठा सुरळीत करण्याचे काम

◆ पान १ वरून पुढे...

सुरू : पांगरी रोड भागातील विद्युत खांब व तारा वाकल्याने वीजपुरवठा खंडित झाला होता. डॉ.सारिका क्षीरसागर यांनी महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना तातडीने काम सुरू करण्याच्या सूचना दिल्या असून, वीजपुरवठा सुरळीत करण्याचे काम सुरू झाले.

## शहरातील पूरग्रस्तांना...

नागरिकांडकून त्यांचे आभार मानले जात आहेत. दोन दिवसांपूर्वी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांनी बीडमध्ये येऊन पुराच्या पाण्याने घराचे नुकसान झालेल्या पूरग्रस्तांना मोफत धान्य आणि ०५ हजार रुपयांची घोषणा केली होती. शनिवार (दि.२७) रोजी त्याची अंमलबजावणी बीड शहरात आ.संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते अन्न धान्य वाटप करून झाली. मोमीनपुरा भागातील लेंडी नाल्याला पूर आल्याने हे पाणी जवळपास ३०० घरात घुसले त्यामुळे घरातील साहित्य, धान्य, कपडे वाहून गेल्याने मोठे नुकसान झाले होते. याचे पंचनामे करून बाधित कुटबांना स्वतः धान्य दुकान क्र.२७ येथे आ.संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते अन्न धान्य वाटप करण्यात आले. त्यामुळे या कुटुंबांना तात्पुरता का होईना आधार मिळाला आहे. यावेळी आ.संदीप क्षीरसागर म्हणाले की, पुढील तीन दिवस अत्यंत काळजीचे असून नदीकाठच्या लोकांनी सतर्क रहावे, आम्ही परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत. जिल्हा प्रशासनाला ही योग्य त्या सूचना केल्या आहेत. कोणालाही वाऱ्यावर सोडणार नाही असा विश्वास व्यक्त केला. यामुळे या संकटाच्या काळात आ. संदीप क्षीरसागर हे लोकांच्या मदतीला तत्पर असल्याचे दिसून येत आहे. तसेच तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनीही आम्ही पूरग्रस्तांना तातडीचे मदत म्हणून धान्य वितरण सुरू केले आहे. लवकरच आर्थिक मदत सुरू होईल असे सांगितले.

## बीड जिल्ह्यातील....

असून, बीड जिल्ह्यातील मच्छिमार भोई समाजाची जाळे,होडी जीवनावश्यक वस्तूंचे प्रचंड नुकसान झाले आहे. याविषयी अधिक माहिती अशी की,मराठवाड्यातील सर्व नद्यां वर छोट्या मोठ्या तळ्यावर पूर परिस्थिती झालेली आहे त्या गरीब स्थानिक मच्छीमारांचे जाळे,होडी,बोटी संसारोपयोगी वस्तू ,धान्यसह लाखो रुपयाची साहित्य वाहून गेलेले आहेत,मच्छिमार कुटुंबाला ५० हजार रुपये नुकसानभरपाई देण्यात यावी,अशी मागणी बीड जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आज दि.२७रोजी पुरपरिस्थितीबाबतच्या दौऱ्यादरम्यान मौजे मंजरथ येथे सामाजिक कार्यकर्ते वसंत परसे व राजेंद्र काका आनंदगांवकर यांनी केली आहे,ग्रामपंचायत मंजरथ येथे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब मा. गटविकास अधिकारी श्रीमती मुळुक मॅडम, विस्तार अधिकारी (पं) श्री. महेंद्र गायकवाड एक्झिक्युटी इंजिनिअर श्री बिडकर सर बांधकाम विभागः धोंगडे सर, शिंदे सर, भोसले सर ग्रामीण पाणी पुरवठा विभाग : सलगर एस डी, रोडे. एस.के. यांनी पूरपरिस्थिती पाहणी साठी भेट दिली, यावेळी जिल्हातील भोई समाजातील व्यक्तींचे जीवनावश्यक वस्तू होडी जाळे बोटी व नुकसानीचे पंचनामा तात्काळ करून घ्या अशा सूचना दिल्या आहेत. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना ५००० आणि धान्य अशी मदत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जाहीर केली पण जिल्ह्यातील माजलगाव धरणांसह,अन्य गोदावरी,सिंदफणा, बिंदुसरा व अन्य नद्याकाठी आपली छोटी छोटी पालं ठोकून आपले पोटाची खळगी भरण्यासाठी नदी,धरणाकाठी अधिवास करतात परंतु ढगफुटी सदृश्य झालेल्या पावसामुळे व पुरामुळे मच्छिमारांची जाळी,होळी व संसारोपयोगी वस्तू वाहून गेली आहेत, भोई समाजातील प्रत्येक कुटुंबाला ५० हजार रुपये भरीव मदत मिळवून देण्यासाठी पालकमंत्री म्हणून काय निर्णय घेतात याकडे जिल्ह्यातील मच्छीमार भोई समाजाचे लक्ष लागले आहे.

## प्रशासनाचा भोगंळ...

भविष्यात पावसाची नोंद नसल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी कोण सोडवणार असा प्रश्न शिवसंग्राम शेतकरी आघाडीचे जिल्हाप्रमुख राजेंद्र आमटे यांनी उपस्थित केला आहे. शेतकऱ्यांना पीक विमा, इतर योजनेचा लाभ मिळण्यासाठी पर्जन्यमापक यंत्र नोंद ग्राह्य धरल्या जातात शेतकऱ्यांना भविष्यात मिळणाऱ्या पीक विमा इतर योजनेवर परिणाम होऊ नये म्हणून प्रशासनाने तत्काळ पर्जन्यमापक यंत्र दुरुस्त कार्यात यावेत अन्यथा म्हाळस जवळा महसूल मंडळ शेजारी कुर्ला महसूल मंडळ, नाळवंडी महसूल मंडळ याच्या नोंदीच्या माध्यमातून नोंदी घेण्यात परंतु विनाकारण धो धो पाऊस पडत असतानाही अहवाल रिकामा देणं दुर्दैवी आहे. तत्काळ नवीन पर्जन्यमापक यंत्र बसवण्यात यावं या पूर्वीही अनेक वेळा पर्जन्यमान यंत्र नादुरुस्तकिंवा बंद असल्यामुळे अनेक शेतकरी पीक विमा इतर योजना पासून वंचित आहेत व दि २६ व २७ तारखा जवळा महसूल मंडळ मध्ये अतिवृष्टी झालेले आहे याची प्रशासनाने नोंद द्यावी असे आवाहन शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, राहुल सोळुंके, बाळू आमटे,राजेंद्र सोळुंके, राजकुमार साळुंके, प्रेम वरगळ, गोपीचंद रसावे, हनुमान लव्हळे, खंडू देवळे, प्रल्हाद आमटे, आदीच्या वतीने करण्यात येत आहे.

## आंदोलनाची उपमुख्यमंत्री...

मिळाली असून, यासाठी ३ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पालकमंत्री ना.अजित दादा, पवार यांच्याकडे या रस्ता कामाचा सततचा पाठपुरावा अखिल भारतीय मराठा महासंघाचे मराठवाडा विभागीय सरचिटणीस मा.विनोद आप्पा इंगोले, बीड जिल्हा अध्यक्ष बापूसाहेब सोळुंके, बीड जिल्हा विद्यार्थी अध्यक्ष भागवत मस्के, बीड जिल्हा उपाध्यक्ष परमेश्वर कवचट, बीड जिल्हा सरचिटणीस बंडू आप्पा कोलंगडे, बीड जिल्हा उपाध्यक्ष शामराव गायकवाड,बीड तालुका उपाध्यक्ष शिवाजी हिदूळे, बीड शहर अध्यक्ष दत्ता शेळके,मा.उमेश शितोळे, यांच्या सह गावातील सरपंच व नागरिकांनी गेल्या पंधरा वर्षा पासून सतत उपोषण व जिल्हाधिकारी यांना निवेदन दिली होती. यांच्या सह स्थानिक नगरसेवक, विविध पक्ष संघटनांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक नागरिक यांच्या अथक परिणामकारक प्रयत्नांमुळे शक्य झाली आहे. नागरिकांच्या बहुप्रतीक्षित मागणीला न्याय न्याय देण्याचे काम पालकमंत्री ना.अजितदादांनी केले आहे. आ.धानोरा रोड, पालवन चौक या सह इतर ४० ते ५० गावांचे दळणवळण, तसेच नव्याने उभ्या राहिलेल्या रेल्वे स्थानकापर्यंतचा हा मुख्य रस्ता, गेल्या अनेक वर्षांपासून तांत्रिक अडथळ्यांमुळे रखडला होता. रस्त्याची दयनीय अवस्था ही नागरिकांसाठी केवळ गैरसोयीचीच नव्हे, तर सुरक्षिततेचाही गंभीर प्रश्न बनली होती. थेट उपमुख्यमंत्री ना.अजित दादा पवार यांच्याशी १५ ऑगस्ट रोजी भेट घेऊन सातत्यपूर्ण संपर्क साधून या विषयावर सातत्याने पाठपुरावा केला. नागरिकांच्या अपेक्षांची जाण ठेवत, अजितदादांनी तात्काळ निर्णय घेत सदर रस्त्यासाठी तीन कोटींचा निधी मंजूर केला. त्याचबरोबर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून नगरपरिषदेला त्वरित पुढील प्रक्रिया करण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत.

◆ पान १ वरून पुढे...

## दूध उत्पादकांनी...

यांनी उपस्थित पशुपालक यांना मार्गदर्शन केले. यावेळी मंचावर चेअरमन शांतीलाल भोसले, -तालुका दुध उत्पादक संघ,माजी नगराध्यक्ष श्री.रंगनाथ धोंडे,आत्माराम फुंदे, शिवाजी घोलप,यांचेसह दूध संघाचे सर्व संचालक मंडळ उपस्थित होते... यावेळी कार्यकारी संचालक मच्छिंद्र धनवडे,मोहन झांबरे, दिनकर दाणी व संघ कर्मचाऱ्यांनी हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले परिश्रम घेतले. पुढे बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले की, आष्टी मतदार संघात या पूर्वी दूध व्यवसाय कमी प्रमाणात होता परंतु आष्टी तालुका दूध संघाच्या योग्य धोरण व सकारात्मक निर्णयामुळे आज आष्टी तालुका दोन लाख लिटर्स पेक्षा जास्त दूध उत्पादन करण्यामध्ये अग्रेसर झालेला असून तालुक्यातील शेतकरी नवनवीन गाई व म्हशींच्या प्रजातीचे पालन करत जास्तीत जास्त दूध उत्पादन करण्याकरिता वेगवेगळ्या प्रयोग करत आहेत, त्याचबरोबर सर्व शेतकऱ्यांनी गाई व म्हशींची प्रजननातील अद्यावत तंत्रज्ञान सेक्स सोर्टेड सिमेन्स (भ्रूण प्रत्यारोपण) या आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपल्या गाई व म्हशींची दूध उत्पादकता वाढवावी यासह दूध उत्पादकता वाढवण्याबरोबरच ब्रीडिंग मॅनेजमेंट करून नवीन प्रजातीच्या गाई निर्माण करणे आवश्यकता आहे... त्यासाठी पशूला मुरघास याचबरोबर ओला -चारा व मॉइश्चर मिक्सर यासह शुद्ध पाणी व वेळेवरती औषध उपचार या सर्व बाबी महत्त्वाच्या आहेत त्याकरिता सर्व शेतकऱ्यांनी जागरूक व सजत राहणे आवश्यक आहे यासह येणाऱ्या काही काळामध्ये ब्रीडिंग व डेअरी फार्म च्या माध्यमातून मतदार संघामध्ये महत्त्वपूर्ण प्रकल्प राबवून नवतरुणांना या क्षेत्रामध्ये आकर्षित करून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मनुष्यबळ कमी वापरून जास्तीत जास्त आर्थिक फायदा शेतकऱ्यांना व पशुपालकांसह नव तरुणांना फायदा होईल याकरिता सकारात्मक धोरण घेण्याचे सांगितले.

## प्रशासनाचा भोगंळ ...

अशी परिस्थिती निर्माण झाली होती . शुक्रवार दिनांक २६ सप्टेंबर रोजी दुपारी सुरू झालेला जोरदार पाऊस आज शनिवार पर्यंत सुरूच होता यामुळे रक्ताळीचा माळ शेतातील पाझर तलाव तुडुंब भरून फुटण्याची मार्गावर आहे हि नागरिकांच्या लक्षात येताच सदरील माहिती गोविंद ढाकणे , भगवान करंजकर व आसाराम ढाकणे यांनी जोला तलाठी सजा चे तलाठी रविंद्र गायकवाड यांना दिली सदरची माहिती मिळताच गायकवाड यांनी जोला गावातील तलावाकडे धाऊ घेऊन तातडीने तलावाचा सांडवा फोडण्यासाठी स्वतः हातात टिकाऊ हातात घेऊन सुरवाती केली त्यांच्या बरोबर गोविंद ढाकणे, आसाराम ढाकणे गोविंद सारुक व बाळासाहेब बिक्कड होते पण माणसाच्या हाताने शक्य नाही असे लक्षात येताच मुरलीबप्पा ढाकणे यांनी जेसिबी मशिन बोलावुन घेत तब्बल सात तास मशिन चालवुन सांडवा खोल करून घेत मौजे जोला गावावरील धोका तलाठी रविंद्र गायकवाड साहेब यांच्या सतर्कतेमुळे टळला आहे.हि संपूर्ण मोहीम तलाठी रविंद्र गायकवाड, भगवान सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष मुरलीधर बप्पा ढाकणे, महसूल सहाय्यक बाळासाहेब बिक्कड, गोविंद ढाकणे, अशोक जेधे, आसाराम ढाकणे, अविनाश सारुक, सखाराम ढाकणे, भगवान करंजकर, गणेश ढाकणे, गोविंद सारुक, ज्योतीराम ढाकणे ,तुकाराम सारुक यांच्यासह गावकरी यांनी यशस्वी केली आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## अतिवृष्टी परिस्थितीमुळे...

साहेब यांनी केले आहे. यामुळे आज रविवार दिनांक २८ सप्टेंबर २०२५ रोजी चा बीड येथे आयोजित केलेला ओबीसी महाएल्गार मेळावा पुढे ढकलण्यात आला असून लवकरच मेळाव्याची तारीख जाहीर केली जाईल असे मेळाव्याचे आयोजक तथा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ड. सुभाष राऊत यांनी कळविले आहे.

## पूरग्रस्त कामगारांसाठी....

जलद, पारदर्शक व तत्काळ होणे आवश्यक आहे, जेणेकरून कोणताही कामगार वंचित राहणार नाही. कामगार हे समाजाची माणसे आहेत, त्यांच्यासाठी ही वेळ प्रशासनाने ठोस पाऊल उचलण्याची आहे.याप्रसंगी गणेश शेवाळे, हारिदास शेलार यांनी शासनाने तात्काळ मदत करावी अशी मागणी केली असून तात्काळ मदत मिळण्याची अपेक्षा निर्माण झाली आहे. पूरग्रस्त कामगारांसाठी ही मदत फक्त आर्थिक आधार नाही, तर त्यांच्यासाठी जीवनावरचा विश्वास टिकवण्याचा आणि सणांचा आनंद पुन्हा परत आणण्याचा मार्ग असल्यामुळे महाराष्ट्र सरकारने कामगारांचा दिवाळी दसरा सण गोड व्हावा म्हणून तात्काळ पन्नास हजार रुपय मदत जाहीर करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते गणेश शेवाळे व हरिदास शेलार यांनी केली आहे

## पुढारी अन...

आश्वासन दिले होते. मात्र हे आश्वासन फक्त कागदावरच राहिले असून, आजपर्यंत कोणतीही कारवाई झालेली नाही. डॉ. गणेश ढवळे म्हणाले की, लिंबागणेश महसूल मंडळातील आपत्ती व्यवस्थापन केवळ नावापुरते आहे. प्रशासनाने गंभीरतेने पावले उचलली नाहीत, तर आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल.

◆ पान ४ वरून पुढे...

## शांताई अर्बन...

संस्थेचे अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर शिंदे म्हणाले,घर, संसार, संस्कार घडवणारी, ज्ञानाने जग उजळवणारी, कष्टाने शिखर गाठणारी – तीच खरी नारीशक्ती प्रेरणादायी आहे. नवरात्री हा देवीच्या शक्तीचा उत्सव आहे आणि समाजातील प्रत्येक आई, बहीण, मुलगी या त्या देवींचेच रूप आहेत. समाजात महिलांनी ज्या धैर्याने व जिद्दीने विविध क्षेत्रांत उत्तुंग कार्य केले आहे, त्याला सलाम करण्यासाठी हा उपक्रम सुरू आहे. शांताई अर्बनने गेल्या चार वर्षांपासून हा सोहळा परंपरेने आयोजित करून स्त्रीशक्तीला मानाचा मुजरा केला आहे. अशा महिलांचा गौरव करून आम्हाला अभिमान वाटतो. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संचालिका शुभांगी शिंदे ,मॅडम ज्योती वाघमारे ,मीरा वाघमारे,मॅनेजर सौ. आरती कुलकर्णी, भागवत मॅडम, प्रिया शिंदे मॅडम आणि शिवा शिंदे यांचे विशेष योगदान लाभले.

## पहाडी पारगाव...

सेवानिवृत्त झाले होते. आमच्या गावातील भजनी मंडळाची जी माळ आहे,त्या माळेतील मुगुटमणी आज तुटून पडला आहे. सर्व गाव शोकाकुल अवस्थेत आहे,सर्वांना अंत्यविधी प्रसंगी अश्रू अनावर झाले होते. भाऊंच्या

◆ पान ४ वरून पुढे...

अंत्यविधीच्या समयी गावातील लहान थोर, आबालवृद्ध,वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते यावरून त्यांची परमार्थिक उंची दिसून आली. त्यांच्या जीवनात त्यांनी सत्य, निष्ठा,प्रामाणिकपणा,श्रद्धा कधी सोडली नाही. वास्तविक जीवन जगत असताना जो जन्माला आला तो जातच असतो असं म्हणतात ।।गेले दिगंबर ईश्वर विभूती । राहिल्या त्या कीर्ती जगा माजी।। देहाच्या गावा आलिया ।जन्ममृत्यूच्या सोहळीया। ना मनो नये धनंजया । जया परी ।। या देहरुपी गावाला आल्यानंतर एक दिवस मृत्यूचा सोहळा ही निश्चित असतो, या उक्तीप्रमाणे आज वसुदेव पवार (भाऊ)महाराज आनंतात विलीन झाले.गावकऱ्यांच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी हरि भक्ति परायण दगडू महाराज गोरे, विष्णु महाराज कोठुळे,अरविंद बाबागिरी महाराज यांनी भाऊंच्या आठवणीला उजाळा दिला.तेव्हा शिवाजी महाराज नांदे, आशोक महाराज कदम, पंचक्रोशीतील भजणी मंडळी व सर्व गावकर्याची उपस्थित होते शेवटी पसायदान ही विश्वप्रार्थना घेण्यात आली व सावडण्याचा कार्यक्रम रविवार दि.२८ सप्टेंबर रोजी आहे असे सूचित करण्यात आले.

## ओबीसी, ईबीसी....

कमी असावे प्रत्येक राज्यासाठी उपलब्ध स्लॉटस ओबीसी लोकसंख्या आकडेवारीनुसार वाटप केले जातील. शिष्यवृत्ती मंजुरी गुणानुक्रमावर आधारित असेल व ती ऑनलाईन पोर्टलमार्फत केली जाईल टीसीएस या सार्वजनिक (केंद्रीय/राज्य/स्थानिक संस्था) अनुदानित किंवा खाजगी

◆ पान ४ वरून पुढे...

शाळा असु शकतात. प्रत्येक राज्य व प्रत्येक वर्गासाठी उपलब्ध स्लॉटस संख्या दरवर्षी एप्रिल महिन्यात जाहीर केली जाईल. किमान ३०% शिष्यवृत्ती मुलीसाठी राखीव असेल. विद्यार्थ्याचे स्वतःचे बँक खाते असणे आवश्यक आहे व अर्ज करताना सर्व माहिती द्यावी. निवडलेल्या शाळांमध्ये आधार आधारित उपस्थिती प्रणाली असावी जी आवश्यक असल्यास केंद्रीय पोर्टलशी जोडता येईल. या योजनेतून लाभ घेणा-या विद्यार्थ्यांना योजनेत समाविष्ट बाबीकरिता इतर कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ घेता येणार नाही. टीसीएसमध्ये पुर्वी शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना मागील वर्गातील अंतिम परीक्षेत मिळालेल्या गुणांसह राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलवर अर्ज करता येईल. प्रत्येक वर्गासाठी राज्यनिहाय मुला-मुलीची स्वतंत्र गुणानुक्रम यादी तयार केली जाईल आणि शिष्यवृतीचे वाटप स्वयंचलितरित्या गुणानुक्रमवार केले जाईल. रक्कम थेट लाभार्थ्यांच्या खात्यात डीबीटी मोडद्वारे जमा केली जाईल रक्कम दरवर्षी १५ ऑगस्टपूर्वी एकाच हप्त्यात दिली जाईल. या योजनेची अंमलबजावणी जीएफआर २०१७ च्या तरतुदीनुसार केली जाईल, शाळेकडून आकारल्या जाणा-या शिक्षण शुल्क,वसतिगृहशुल्क आणि इतर शुल्काकरिता वार्षिक कमाल ७५०००/-प्रति विद्यार्थी ( इ.९ वी व १० वी साठी) व १२५०००/- प्रति विद्यार्थी (इ.११ वी १२ वी साठी) इतके अनुदान दिले जाईल. ज्या टॉप क्लास शाळांनी १० वी १२ वी मध्ये १००% निकाल टिकवुन ठेवला आहे त्यांची निवड संयुक्त सचिव ( बी सी) यांच्या अध्यक्षतेखाली व शालेय शिक्षण विभाग व नीती आयोगाच्या प्रतिनिधीच्या समितीद्वारे केली जाईल..

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# निवारा, शैक्षणिक साहित्य आणि जेवणाची तातडीने केली व्यवस्था नागरिकांना मिळाला दिलासा

## थोडक्यात...

### म्हाडाची १ ऑक्टोबर रोजी सोडत

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत १४०८ सदनिका, भुखंड, गाळ्यांकरीता ३० जून, २०२५ रोजीच्या विविध वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आलेली होती. जाहिराती अन्वये ऑनलाईन पद्ध्तीने अद्यावत अशा नविन एकात्मिक लॉटरी प्रणाली अंतर्गत ७ हजार ८८१ अर्जांची ऑनलाईन संगणकीय नोंदणी झाली आहे. उपरोक्त अर्जांची संगणकीय सोडत ०१ ऑक्टोबर, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. संगणकीय सोडतीचे उद्घाटन सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते करण्याचे नियोजित असल्याचे छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे उपमुख्य अधिकारी जे.एस.नामेवार यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे.

### राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने एड्स जनजागृती



**नेकनूर । प्रतिनिधी**

प्रमिलादेवी पाटील महाविद्यालय नेकनूर येथील स्त्री व कुटीरउद्योग रुग्णालय येथे विद्यार्थ्यांना एड्स जनजागृती , आयसीटी व पोस्टरद्वारे माहिती देण्यात आली. हा कार्यक्रम प्राचार्य डॉ. ढास डी.के. यांच्या मार्गदर्शकाखाली घेण्यात आला.स्त्री व कुटीर उद्योग रुग्णालयातील शारदा गोरे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना एड्स कसा होतो कोणत्या कोणत्या माध्यमाद्वारे होतो व त्याविषयी काय उपाययोजना केल्या पाहिजेत व स्वसंरक्षण कसे केले पाहिजे याची पोस्टरद्वारे माहिती देण्यात आली राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. इनकर व्ही.एस. आणि प्राध्यापक रामरूले डी के यांनी विद्यार्थ्यांना स्त्री व कुटीरउद्योग येथे नेऊन एड्स विषयी माहिती करून दिली या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन भूगोल विभाग प्रमुख डॉ.जाधव जे.के. यांनी केले. या कार्यक्रमासाठी विद्यार्थिनी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पिंपळनेरात ग्रामदैवत तुळजाभवानी देवीचा जागर

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

पिंपळनेर येथील ग्रामदैवत तुळजाभवानी माता मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त घटस्थापना करण्यात आलेली असुन अभिषेक करून दररोज पूजा करण्यात येत आहे . पिंपळनेर येथील देवीच्या नवरात्र उत्सवाला मोठी परंपरा आहे. या गावात पूर्वीपासूनच नवरात्र उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. नवरात्र उत्सव आणि दसरा झाल्यानंतर मोहिमेला जाण्याची परंपरा पूर्वी होती. त्यामुळे या उत्सवात सर्वांनी एकत्र येण्याची परंपरा आजही जपली जाते. उद्योग, नोकरीनिमित्त बाहेर गावी गेलेले लोक या नऊ दिवसात गावाकडे येतात. नऊ दिवस मंदिरात आरती, छबिना, कथाकथन असे कार्यक्रम होतात. नवमीला जागरणाचा कार्यक्रम होतो. या वेळी गावकरी रात्रभर छबिना खेळतात. त्यामुळे रात्रभर मंदिरात मोठी गर्दी असते. दसऱ्याच्या दिवशी देवीची मूर्ती .शिलांगणाने या उत्सवाची सांगता होते. गावाचं गावपण जपत व कामानिमित्त गावापासून दूर गेलेल्या लोकांना पुन्हा गावात आणणारा हा नवरात्रीचा उत्सव घटस्थापनेने सुरू झाला आहे .

ईट येथे नवरात्र उत्सव सुरु – पिंपळनेर पासून जवळच असलेल्या ईट येथेही फार मोठे ग्रामदैवत असलेल्या गुगळादेवी मंदिर संस्थान येथे फार मोठा उत्सव होत आहे .दररोज येथे देवीचा जागर होत असून अन्नदान महाप्रसाद होत आहे .पिंपळनेर येथील प्रमोद मंत्री यांनी महाप्रसादाचे आयोजन करून सर्व भाविक भक्तंना महाप्रसादाचे वाटप केले.

## निवारा, शैक्षणिक साहित्य आणि जेवणाची तातडीने केली व्यवस्था नागरिकांना मिळाला दिलासा

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोद्यात अतीवृष्टीमुळे पाटोदा आणि आसपासच्या गावांमध्ये गंभीर पूरस्थिती निर्माण झाली होती. अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे जीवन विस्कळीत झाले होते, तर मुलांचे शैक्षणिक काम ठप्प झाले होते. अशा गंभीर परिस्थितीत आमदार सुरेश धसांचे शिलेदार, पाटोदा नगरपंचायतचे नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव आणि नगरसेवक आसिफशेठ सौदागर यांनी तत्परतेने पुढाकार घेतला आणि पूरग्रस्तांना मदत करण्याचे काम सुरुवातीपासूनच हातात घेतले.नगरपंचायत प्रशासनाच्या सहकार्याने त्यांनी प्रभावित नागरिकांसाठी तातडीने निवारा उभारला, ज्यात कुटुंबांना सुरक्षितता मिळाली. तसेच, मुलांसाठी शैक्षणिक साहित्याचे वाटप करून त्यांचा अभ्यास सुरू ठेवण्यास मदत करण्यात आली. पूरग्रस्तांना गरजेनुसार जेवणाची सोयही करण्यात आली, जे नागरिकांसाठी मोठा दिलासा



ठरला.नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव यांनी सांगितले, आपल्या नागरिकांची सुरक्षा आणि मदत हीच आमची प्राथमिकता आहे. संकटात कुणीही विसरले जाऊ नये, यासाठी आम्ही तत्पर आहोत. या कठीण काळात प्रशासन आणि स्वयंसेवकांच्या मदतीने आम्ही लोकांपर्यंत मदत पोहोचवत आहोत. नगरसेवक आसिफशेठ सौदागर यांनीही नागरिकांना दिलासा देताना म्हटले, प्रत्येक नागरीकाची काळजी हा आमचा उद्देश आहे. पूरग्रस्तांना तातडीची मदत पोहोचवणे आणि त्यांच्या जीवनात सुसूत्रता आणणे हे आमचे कर्तव्य आहे. आम्ही प्रत्येक गरजू पर्यंत मदत पोहोचवण्यासाठी आमदार सुरेश आण्णा धस यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण प्रयत्न करत आहोत. नागरिकांनी या मदतीमुळे संकटाच्या काळात दिलासा मिळाल्याचे सांगितले, तर स्थानिक समाजसेवी संस्थांनी असे काम सतत सुरू ठेवण्याची अपेक्षा व्यक्त केली. या मदत कार्यामुळे पाटोद्यातील लोकांमध्ये नगरपंचायत प्रशासन आणि आमदारांचे शिलेदार यांच्यावर विश्वास वाढला आहे, तसेच जनतेला प्रशासनाकडून तातडीची मदत मिळते हे दिसून आले.

## ह.भ.प. मधुकर महाराज शिंदे यांची बीड जिल्हा समन्वयक पदी नियुक्ती ; अनिलदादा जगताप यांच्याकडून सत्कार

### समाजजागृती व संतविचारांचा प्रसार गतिमान होणार: अनिलदादा जगताप

**बीड । प्रतिनिधी**

वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या आशीर्वादाने तसेच महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे, संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांतजी शिंदे व शिवसेना सचिव संजयजी मोरे यांच्या आदेशानुसार बीड जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. या कार्यकारिणीत ह.भ.प. मधुकर महाराज शिंदे यांची बीड जिल्हा समन्वयक पदी नियुक्ती करण्यात आली. या नियुक्तीनिमित्त शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी मधुकर महाराज यांना आपल्या निवास्थानी आमंत्रित करून त्यांचा हृदय सत्कार



केला व मनःपूर्वक अभिनंदन केले. अनिलदादा जगताप यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देताना सांगितले की, शिवसेना धर्मवीर आध्यात्मिक सेनेच्या माध्यमातून अध्यात्मिक प्रबोधन, समाजजागृती आणि संत विचारांचा प्रसार होणार आहे. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांचे जनहिताचे काम आणि विकासदृष्टी जनतेपर्यंत पोहोचविण्यात ह.भ.प. मधुकर महाराज शिंदे महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. तसेच दरम्यान ह.भ.प. मधुकर महाराज शिंदे आणि विष्णुम्हाराज सुरवशे यांनी नियुक्ती केल्याबद्दल महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे, संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांतजी शिंदे व शिवसेना सचिव संजयजी मोरे यांच्यासह शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांचे आभार मानले. याप्रसंगी गेन्देव महाराज घरत, ज्ञानेश्वर महाराज घरत, ब्रम्हदेव महाराज जगताप, सदाशिव सुर्वे (विभाग प्रमुख), सुरशे माने(उपतालुका प्रमुख), गणेश भांडवले( शहर प्रमुख), शिवाजी निर्धार (माझी संरपच), मात्रे सर, बाबुराव सुर्वे, रेवन सुर्वे ( ए.स. टी महामंडाळ), बालासाहेब निर्धार (उपसरपंच), प्रकाश शिंदे, देविदास शिंदे, कृष्णा सुर्वे, दत्ता शिंदे, दिपक शिंदे, अविनाश शिंदे, प्रदिप शिंदे, आकाश जगताप, लक्ष्मीकांत दोडके आणि प्रतिक कांबळे उपस्थित होते.

## किती दिवस दौरे करणार शेतकरी बांधवांना भरीव मदत द्या: मुक्ताराम सोनवणे



**बीड । प्रतिनिधी**

शेतकरी बांधवांचा सरकारने अंत पाहू नये तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करून पंजाब प्रमाणे पन्नास हजार रुपये मद्दत शेतकऱ्यांच्या बँक खात्यात टाकावी. असे आह्वान शेतीनिष्ठ शेतकरी मुक्ताराम सोनवणे यांनी केले. तशेच अनेक दिवसाची पिक कर्ज माफीची मागणीही पूर्ण करावी. हे शेतकरी बांधवाच्या जिवनातील भयानक संकट आहे. शेतकर्यांच्या डोळ्यातील अश्रू थाबत नाहीत. हि विचित्र परस्थिती शासने व प्रशासनाने गाभिर्याने लक्षात घेऊन लवकरात लवकर दुष्काळ जाहीर करावा. तशेच कर्ज माफी सह हेक्टरी पन्नास हजाराची मद्दत बँक खात्यात टाकावी. मराठवाड्यात मागील दहा दिवसापासून सुरु असलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड हाल होत आहेत. तशेच शेती पिकाचे मोठ्या प्रमाणात नुसकान झाले आहे. आणि अतिपाण्यामुळे शेतातील पिकासह माती वाहून गेली. हातातोडाशी आलेला घास वाहून गेला आहे. असी दैनिय अवस्था प्रथमच झाली. झालेले शंभर टक्के नुसकान तर भरून काढण शक्य नाही परंतु आधारची गरज आहे. लहान बाळा पासून ते वयस्कर माणसांच्या डोळ्यातील आश्रू खूप काही सांगत आहेत. या भयानक परस्थित शानने अहवाल, पंचनामे व तपासण्याच्या नावाखाली वेळ मारून नेहु नये.. सढळ हाताने मद्दत करावी असी शेतकरीराजाची आर्थ हाक आहे.

## स्वा . सावरकर महाविद्यालय ; स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

शारदीय नवरात्र निमित्त स्वा.सावरकर महाविद्यालयात विद्यार्थिनीसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते सखी सावित्री अंतर्गत तक्रार निवारण समिती अंतर्गत दिनांक २३ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर २०२५ तीन दिवस विद्यार्थिनींसाठी विद्यार्थ स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. शारदा नवरात्रीनिमित्त महाविद्यालयात २२ सप्टेंबर २०२५ रोजी प्राचार्य प्रो.डॉ. सुहास मोराळे यांच्या शुभहस्ते श्री शारदा देवीची प्रतिष्ठापना करण्यात आली यावेळी




महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर सुहास मोराळे यांनी विद्यार्थिनींना सुरक्षितेच्या दृष्टीने मार्गदर्शन केले. आजच्या काळात शिक्षणाबरोबर शारीरिक व मानसिक दृष्ट्या सुदृढ व सक्षम बनावे असे आपले मत व्यक्त केले, तर श्री. उत्तरेश्वर सपाटे जिल्हा व शहर कराटे डो असोसिएशन बीड. अध्यक्ष वो मुख्य प्रशिक्षक उत्तरेश्वर सपाटे यांनी विद्यार्थिनींना प्रात्यक्षिके दाखवून स्वसंरक्षण, प्रतिकार कसा करावा त्यांच्यातील आत्मविश्वास कसा वाढेल यासाठी मन मनगट आणि मस्तिष्क सुदृढता याविषयी उत्तम मार्गदर्शन केले. कार्यशाळेसाठी उपप्राचार्य डॉक्टर लक्ष्मीकांत लक्ष्मीकांत बाहेरगावाणकर डॉक्टर उत्तम साळवे , सखी सावित्री अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या प्रभारी डॉ. सुनिता कुरडे, डॉ .स्वाती कुलकर्णी, तसेच सर्व महिला प्राध्यापक आणि विद्यार्थिनींची मोठी उपस्थिती होती.

## पाटोद्यावर अस्मानी संकट! तहसीलदार निलावड यांनी : नागरिकांना दिला आधार, धैर्य आणि सेवा

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोद्यावर अचानक आलेल्या मुसळधार पावसामुळे शहरात रस्ते, गल्ल्या आणि घरे पाण्याखाली बुडाले. नागरिक त्रस्त झाले, भय आणि अडचणींनी शहर व्यापले. रस्त्यांवर वाहतूक अडचणींनी थांबली, तर अनेक घरांमध्ये पाणी शिरले.अशा कठीण प्रसंगात तहसीलदार निलावड साहेब खंबीरपणे नागरिकांच्या पाठीशी उभे राहिले आणि संकटमोचनात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी संकटात धैर्य दाखवून नागरिकांना आधार दिला आणि प्रशासनाच्या विश्वासाला बळकटी दिली.नागरिकांच्या समस्या त्वरित सोडवण्याचे काम करत तत्परता आणि कामगिरी – संकटावर मात! धैर्य आणि समर्पण संकटाच्या काळात तहसीलदारांनी नागरिकांना धीर दिला. मदत करण्यासाठी टीमचे संयोजन केले आणि नागरिकासाठी मार्गदर्शन केले. त्यांच्या नेतृत्वामुळे नागरिकांचा



आत्मविश्वास वाढला, संकटावर मात करण्याची ऊर्जा मिळाली. संकटात धैर्य, नागरिकांना आधार! देत जनसेवेचा संदेश तहसीलदार निलावड साहेबांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवले की जनसेवा हेच खरे ध्येय आहे. त्यांनी संकटमोचनात आपल्या कर्तव्याची जबाबदारी पार पाडली,नागरिकांसाठी स्वतःची धैर्य दाखवले आणि सेवा सर्वोपरि ठेवली व जनसेवा हीच खरी ईश्वरसेवा! दाखवून दिलीनागरिकांचा विश्वास आणि कौतुक स्थानिक नागरिकांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले आहे. त्यांच्या धैर्य, समर्पण आणि तत्परतेमुळे शहरात विश्वास, सकारात्मक ऊर्जा आणि मदतीची भावना पसरली आहे.संकटात धैर्य, तत्परता, जनसेवा आणि नेतृत्व – या चार गोष्टींचा संगम पाहायला मिळाला. तहसीलदार निलावड साहेब हे शहरातील नागरिकांसाठी खरे प्रेरणास्त्रोत ठरले आहेत. त्यांच्या कार्याने संकटात नागरिकांना मदत मिळाली आणि प्रशासनाच्या कार्यावर विश्वास वाढला.

## तुकाराम राठोड सरांनी जि.प.प्रा. सरकारखोरी शाळेला दिली बाव्वीस वर्षे सेवा शाळेसाठी सरांच योगदान

पहिले गुरु ज्यांनी हातात पेन कसा धरायचा त्यापासून ते हातात खडू, मार्कर, पेन जिल्हा परिषदेमध्ये येऊन अजून विद्यार्थ्यांना कसे घडवायचं, असं शिकवणारे शिक्षक.शाळा शिकत असताना अनेक शिक्षक भेटले, पण काही शिक्षक असे असतात, ज्यांना आपण कधीच विसरू शकत नाही. बरोबर असाल तर कौतुक करायचं, चुकलात तर प्रेमाने ती चूक दाखवून द्यायची–हे फक्त शिक्षकाचं काम नाही, तर ती एक निस्वार्थ सेवा आहे.तुकाराम राठोड सर गेली २२ वर्षे सरकारखोरी तांडा शाळेची सेवा करत आहेत. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य विद्यार्थ्यांना योग्य ज्ञान आणि कौशल्ये देण्यासाठी घालवले आहे. शिक्षकी पेशात ते नेहमीच प्रामाणिक, जबाबदार, आदरणीय आणि अत्यंत आदरणीय व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जातात. आम्ही त्यांना नेहमीच एक कुशल शिक्षक, उदार, सुशिक्षित आणि मनमोकळेपणाचे मानले. २०२५–२६ च्या शिक्षकांच्या प्रशासकीय बदलीमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सरकार खोरी तांडा शाळेचे मुख्याध्यापक श्री.तुकाराम राठोड सर यांची बदली झाली आहे. त्यांना लाडक्या सरांची बदली बदली झाल्यामुळे पालक व विद्यार्थी आपसुकच भावनिक झाले.गेल्या २२ वर्षांपासून श्री.तुकाराम राठोड सरांनी सरकारखोरी तांड्यावरील शाळा नावारूपाला आणली. शाळेसाठी प्रचंड मेहनत घेतली. वस्ती



शाळा म्हणून त्यांनी सुरू केलेली ही शाळा टिकवण्यासाठी त्यांनी अतोनात प्रयत्न केले. २००७–०८ ला शाळेचे बांधकाम झाल्यानंतर शाळा शासकीय इमारतीमध्ये भरायला लागली. इतक्या दिवसांचा संघर्ष आज शाळा नावारुपाला आली आणि सरांची बदली झाली. खूप मोठं दु:ख लेकरांसोबत शाळेच्या प्रत्येक घटकाला झालं आहे. रात्रंदिवस शाळेसाठी मेहनत करण्याची तयारी असणारे राठोड सर शाळेची फार मोठी ताकद राहिले. भविष्यातही सर शाळेसोबत असणारच आहेत पण शिक्षक म्हणून ते शाळेमध्ये नसणार आहेत ही गोष्ट खूप वेदनादायक आहे. लेकरांसाठी मातृत्ववत्सल व मातृहृदयी व्यक्तिमत्व आज शाळेतून जाताना शाळा ही नक्कीच ढसाढसा रडत असणार आहे. राठोड सरांची ख्याती खुप मोठी होती. त्यांच्यामुळे अनेक विद्यार्थी नौकरी, वकील, चइइड, उद्योजक, पत्रकार, झाले. सरांनी अनेक विद्यार्थी घडविण्याचे काम केले या जि.प.प्रा. शाळा सरकार खोरी तांडा आपणास कदापि विसरणार नाहीत. सरांनी स्व खर्चाने शाळेला खर्च केला शाळेतील पत्रे उडून गेल्यामुळे गटशिक्षणाधिकारी साहेबांना निवेदन दिले.अनेक पेपरला बातम्या लावल्या अनेक वर्षांपासून संमलनाचे कार्यक्रम आयोजित केले. अशी अनेक कामे सरांनी शाळेसाठी आटापिटा केली.श्री. राठोड सर यांनी नेहमीच आपल्या सर्व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन व प्रेरणा दिली आहे. त्या क्षणांमध्ये त्यांनी भविष्यातील नागरिक घडवले आणि प्रत्येकाला हुशार विद्यार्थी बनवले. शालेय जीवनात ते उत्कृष्ट शिक्षक होते. राठोड सरांनी नेहमीच त्यांच्या उत्कृष्ट गुणांनी सर्वांना प्रेरणा दिली आहे. आदर्श मुख्याध्यापक म्हणून आम्ही सरांकडे पाहत आहोत.सरांना पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा.

**शब्दकांत : पत्रकार संभाजी लांडे ,**
**दै. मराठवाडा पत्र वडवणी**


### मा. ॲड.अजित एम. देशमुख, लवाद अधिकारी, लवाद न्यायाधिकरण, बीड यांचे समोर

लवाद न्यायाधिकरण कार्यालय, “मधुमीन”, डॉ.हाटवटे बिल्डींग, प्रियदर्शनी बाल उद्यानच्या पश्चिमेस, राजीव गांधी चौक, नगर रोड, बीड ता.जि. बीड (मल्टिस्टेट को-ऑपरेटिव सोसायटीज ॲक्ट 2002 व अब्रिटेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)

**जाहीर नोटीस / समन्स** — **दि.** 12/09/2025

अर्जदार : एन साई मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. लातूर ता. जि. लातूर

**विरूद्ध - गैरअर्जदार**

1) लवाद अर्ज क्र. एन साई/01/2025 1) नजमुन कलीम बागवान 2) नाजिम जिलानी बागवान 3) जुनेद कलीम बागवान 4) कलीम लालमियाॅं बागवान सर्व रा. रांजणी ता. कळंब जि. धाराशिव

2) लवाद अर्ज क्र. एन साई/02/2025 1) कलीम लालामियाँ बागवान 2) मुसा अजिज शेख 3) श्रीरंग वैजिनाथ कुचेकर सर्व रा. रांजणी ता. कळंब जि. धाराशिव

(प्रत्येक प्रकरणात वर नमुद क्र. 1 हे कर्जदार तर अन्य जामीनदार आहेत.)

या नोटीस द्वारे तुम्हा वरील सर्व गैरअर्जदारांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमच्या विरूद्ध वर नमुद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केले आहेत. सदर लवाद दाव्याच्या सुनावनी नोटीस आपना पैकी काहीनी घेऊन गैरहजर राहिलात. काहीनी नोटीस घेण्यास नकार दिला. तर काहींच्या नमुद पत्यावर नोटीस बजावण्यात आल्या आहेत / नाहीत. तसेच काहींच्या नोटीस तामील होत नाहीत. तरी सदर लवाद अर्जाच्या चौकशी कामी आपण दि. 09/10/2025 रोजी सकाळी 11 वा. या लवाद न्यायाधिकरण कार्यालयात तुम्ही अथवा तुमच्या वकीलांन सह हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास या बाबत तुमचे काहीही म्हणने नाही असे समजून तुमच्या विरूद्ध लवाद अर्जाचा एकतर्फी हुकूम / अदेश करण्यात येईल. याची नोद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस / समन्स माझ्या सही व शिक्क्यांची दिले आहे.

ॲड.अजित एम. देशमुख
लवाद अधिकारी, बीड.

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • रविवार, दि. २८ सप्टेंबर २०२५ • पान ४

## थोडक्यात...

### पहाडी पारगाव येथील वसुदेव महाराज पवार यांचे अल्पशा आजाराने निधन
#### वारकरी संप्रदायातील रत्न हरवले

**वडवणी । प्रतिनिधी**



धारूर तालुक्यातील पहाडी पारगाव येथील अध्यात्मिक,परमार्थिक क्षेत्रातील निष्ठावंत वारकरी ह.भ.प.वसुदेव लक्ष्मण पवार महाराज वय ७० वर्ष यांचे शुक्रवार दि.२६ सप्टेंबर २०२५ रोजी पहाटे ५:०० वाजता छत्रपती संभाजीनगर येथे अल्पशा आजाराने निधन झाले पहाडी पारगाव येथील राजवाडा स्मशान भूमी मध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात चार भाऊ, भाऊजी,दोन मुलं,एक मुलगी,सुना, नातवंड असून सर्व परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे या दुःखा मधून त्यांच्या परिवाराला सावरण्याचं बळ मिळो हीच ईश्वरास प्रार्थना गावकरी करत आहेत. वारकरी वसुदेव भाऊ महाराज म्हणजे नित्य काकडा,हरिपाठ आणि सदैव नामस्मरण हा त्यांचा दिनक्रम होता तसेच विणेकरी म्हणून अनेक गावच्या सप्ताहामध्ये त्यांनी आपले सेवा दिलेली आहे. भारतीय टपाल खात्यात पहाडी पारगाव,चारदरी आणि वडवणी या ठिकाणी पोस्टमन म्हणून ३४ वर्ष सेवा देऊन ते ▶ उर्वरित पान २ वर

### संघाच्या शंभर वर्षाच्या प्रवासात संपूर्ण समाज सदैव सोबत राहिला - ॲड. रोहित सर्वज्ञ
#### राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी उत्सव संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रीय स्वंयसेवक संघाच्या स्थापनेला या विजयादशमीला शंभर वर्ष पूर्ण होत असून स्वाभाविकच त्याचा उत्साह संपूर्ण स्वयंसेवकांमध्ये आहे. संघाच्या या शंभर वर्षाच्या प्रवासात संपूर्ण हिंदू समाजाचे सहकार्य संघाला लाभले आहे. समाजाच्या सहकार्यामुळेच हा शताब्दी प्रवास यथोचित झाला आहे. परंतु संघाचे कार्य अविरत अखंडपणे चालणारे आहे. मातृभूमीला परम वैभवसंपन्न करण्यासाठी सर्वांना सोबत मिळून काम करावे लागणार आहे. संघाच्या पंच परिवर्तनातून समाज परिवर्तन आपल्याला घडवून आणायचे आहे असे वक्तव्य राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे प्रांत प्रचार प्रमुख ड. रोहितजी सर्वज्ञ यांनी यावेळी केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी उत्सव कडा येथे आज सायंकाळी ६.०० वाजता संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर मा. तालुका संघचालक श्री दादासाहेब आश्रूबा शेकडे, प्रशासकीय अधिकारी (श्री अमोलक संस्था कडा) मा. प्रा. नवनाथजी पडोळे, उपस्थित होते.

### ओबीसी, ईबीसी, डीएनटी विद्यार्थ्यांसाठी टॉप क्लास शिक्षणाची केंद्रीय क्षेत्र योजना शाळा, महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे अर्ज पोर्टलवर भरण्याची सूचना

**बीड । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री यशस्वी योजनेतंर्गत ओबीसी, ईबीसी, डीएनटी विद्यार्थ्यांसाठी शाळांमधील टॉप क्लास शिक्षणाची केंद्रीय क्षेत्र योजना (२०२५-२६) योजना राबविण्यात येत आहे. ओबीसी, ईबीसी, डीएनटी प्रवर्गातील इयत्ता ९ वी ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण आणि शाळांमधील टॉप क्लास सुविधा उपलब्ध करून देणे हा या योजनेचा उद्देश आहे. तरी शाळा महाविद्यालयांनी सदर प्रवर्गातीत इयत्ता ९ वी ते १२ वी या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे अर्ज नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर भरण्याची कार्यवाही दि. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत करावी, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक डी.बी.क्षीरसागर यांनी प्रसिदधी पत्रकाव्दारे केले आहे. सदर योजनेचे निकष पुढीलप्रमाणे आहेत. ओबीसी, ईबीसी, डीएनटी प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यास इयत्ता ९ ते १२ वी पर्यंत शिक्षणासाठी खर्चाची मदत करून उच्च प्रतीचे शिक्षण उपलब्ध करुन देणे, उत्पन्न रु. २.५० लाखापेक्षा ▶ उर्वरित पान २ वर

### डॉ.सुरेशजी साबळे यांच्या हस्ते स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान चे उद्घाटन



**माजलगाव । प्रतिनिधी**

ग्रामीण रुग्णालय माजलगाव येथे स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान आयोजित करण्यात आले असता माजलगाव शहरातील महिलांनी व नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला, तसेच शिबिराचे उदघाटन ग्रामीण रुग्णालय माजलगाव चे वैद्यकिय अधीक्षक डॉ.सुरेश साबळे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले, सदरील शिबीर मध्ये स्त्रीरोग तज्ञ, कान, नाक घसा तज्ञ, फिजिशियन,बाल रोग तज्ञ, दंतचिकित्सक, नेत्राचिकित्सक, क्खत रुग्णांचे समुपदेशन, किशोरवयीन मुलींचे समुपदेशन, मानसिक आरोग्य समुपदेशन, तसेच राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत समुपदेशन, लसीकरण या अभियान अंतर्गत रुग्णांना सेवा देण्यात आली. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी वैद्यकीय अधिकारी डॉ.योगिता भगत, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.मधुकर घुबडे, स्त्री रोग तज्ञ डॉ.अरुण सानप यांनी परिश्रम घेतले व शिबीर यशस्वी केले.

## सणासुदी काळात बचत गटाच्या महिलाना बाजारपेठ उपलब्ध करून द्या: डॉ. ज्योती मेटे

### महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांच्या कडे डॉ. ज्योती मेटे यांनी केली मागणी

**बीड । प्रतिनिधी**



महाराष्ट्र शासनाने लाडकी बहीण योजना अंमलात आणलेली असून या अर्थसहाय्य मिळणाऱ्या महिलांच्या हाताला काम मिळवून दिल्यास या महिला आत्मनिर्भर होतील. काही महिन्यांवर येणाऱ्या दिपावली करीता महिला बचत गटांना बाजारपेठ मिळवून देणे अत्यंत गरजेचे आहे, त्याकरीता जिल्हानिहाय संबंधित जिल्हा मध्यवर्ती बँकेचे आवारात जागा अपलब्ध करुन देणेबाबत सहकार विभागाचे सहकार्याने कार्यवाही करीता येवू शकेल. अशी मागणी महिला व बालकल्याण मंत्री मा. आदिती तटकरे यांच्या कडे शिवसंग्राम अध्यक्ष डॉ ज्योती विनायकराव मेटे यांनी भेटी दरम्यान केली आहे.प्रसंगी समवेत शिवसंग्राम मुंबई महिला जिल्हाध्यक्ष अनुश्री माळगावकर उपस्थित होत्या. सारथी या स्वायत्त संस्थेकडून तारा दूत' नियुक्ती सामाजिक न्याय विभागाचे साहाय्याने केल्यास महीलांच्या सक्षमीकरणाबाबत एक पाऊल पुढे जाता येईल सदर नियुक्ती एक महीन्याच्या आत होण्याबाबत कृती कार्यक्रम आखण्यात यावा.राज्यातील प्रत्येक तालुका मुख्यालयामध्ये रूग्णालये, न्यायालय अथवा इतर शासकीय कामकाजाकरीता महीलांना मोठया संख्येने दररोज ये-जा करावी लागते परंतु सार्वजनिक स्वच्छतागृहाअभावी त्यांची मोठी कुचंबना होते त्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग/नगरपालिका यांच्या सहाय्याने कार्यवाही केल्यास महीलांना दिलासा मिळेल. अशा महिला सक्षमीकरणाच्या विविध विषयांवर या भेटीवेळी मा. अदिती तटकरे यांच्याशी सविस्तर चर्चा केली त्यांनी या विषयी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

## अतिवृष्टी परिस्थितीमुळे ना.छगनराव भुजबळ साहेब यांच्या उपस्थितीत होणारा ओबीसी महाएल्गार मेळावा पुढे ढकलला! - ॲड. सुभाष राऊत

### पूरग्रस्त शेतकरी आणि नागरिकांना मदत करण्याचे ना. भुजबळ साहेब यांचे आवाहन

**माजलगाव । प्रतिनिधी**



ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते ना. छगनराव भुजबळ साहेब यांच्या उपस्थितीत रविवार दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ४ : ०० वाजता बीड येथे आयोजित ओबीसी महाएल्गार मेळावा पुढे ढकलण्यात आला असून लवकरच पुढील तारीख जाहीर करण्यात येईल असे मेळाव्याचे आयोजक तथा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांनी कळविले आहे. बीड जिल्ह्यासह महाराष्ट्र राज्यात सर्वत्र अतिवृष्टी होत असून मुसळधार पावसाने नद्यांना पूर आलेला आहे. अनेक पुलावरून पाणी जात असल्याने वाहतूक ठप्प करण्यात आलेली आहे. शेतकऱ्यांच्या शेतात आणि नागरिकांच्या घरात पाणी शिरले असल्याने परिस्थिती अवघड बनली आहे. अशा परिस्थितीत शेतकरी आणि नागरिकांना मदत करणे आपले कर्तव्य असल्याने बीड येथे आयोजित ओबीसी महाएल्गार मेळावा पुढे ढकलून पूरग्रस्त नागरिकांना, शेतकऱ्यांना मदत करावी असे आवाहन ओबीसींचे राष्ट्रीय नेते ना. छगनराव भुजबळ ▶ उर्वरित पान २ वर

## पूरग्रस्त कामगारांसाठी शासनाने तात्काळ पन्नास हजार रुपय मदत जाहीर करावी : गणेश शेवाळे, हारिदास शेलार

**पाटोदा । प्रतिनिधी**

गेल्या पाच ते सहा दिवसापासून अतिवृष्टी आणि पूर परिस्थितीमुळे शहर-गावातील कामगारांच्या हाताला काम नाही. अनेक कुटुंब अन्न आणि दैनंदिन गरजा भागवण्यात अपयशी ठरत आहेत. घरातील दिवे मंदावलेले,घर रिकामे, चेहऱ्यावर चिंता आणि भीती अशी दृश्ये सर्वत्र दिसत आहेत. या गंभीर परिस्थितीवर लक्ष वेधून समाजसेवक गणेश शेवाळे, हारिदास शेलार यांनी म्हटले की,शासनाने कामगारांसाठी दिवाळी-दसऱ्या आधी तात्काळ पन्नास हजार रुपयांची आर्थिक मदत जाहीर करावी. ही मदत कामगारांच्या कुटुंबांना सणाच्या आनंदात सहभागी होण्याची संधी देईल, त्यांच्या तोंडातील अश्रू हसण्यामध्ये रूपांतरित होतील आणि जीवनमान उंचावेल. कामगारांचे हाल पाहून काहीही न करता राहणे म्हणजे समाजाच्या जबाबदारीपासून दूर जाणे. मदत वितरण ▶ उर्वरित पान २ वर



माजी आमदार बाळासाहेब काका आजबे यांनी डोंगर किनी येथील पूरग्रस्त भागाची केली पाहणी. छाया डॉ. राजू सानप डोंगरकिन्ही.



बीडमध्ये पहिल्यांदाच सार्वजनिक तुळजाभवानी नवरात्र महोत्सवाच्या आरतीसाठी गजानन नगर पेठ बीड येथे तृतीयपंथीय बांधवांना निमंत्रित करण्यात आले होते. त्यांच्या हस्ते (दि.२७) रोजीची मातेची आरती पार पडली. या आरतीच्या निमित्ताने सामाजिक ऐक्य, समानता आणि सर्वसमावेशकतेचा सुंदर संदेश देण्यात आला आहे.

## पुढारी अन आधिका-यांचे फोटोसेशन संपलं; रस्त्याची दुरुस्ती मात्र अद्याप गायब

**लिंबागणेश । प्रतिनिधी**



बीड तालुक्यातील लिंबागणेश ते बोरखेड रस्ता गेल्या आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे पूर्णपणे खचून वाहतूक ठप्प झाली आहे. दुध-दुभते, भाजीपाला, शेतीमाल बाजारात नेणे, तसेच आजारी रुग्णांना दवाखान्यात नेण्यासाठी ग्रामस्थांना प्रचंड हाल सहन करावे लागत आहेत.

स्थानिक लोकप्रतिनिधी आमदार संदिप क्षीरसागर, राजेंद्र मस्के यांच्यासह गटविकास अधिकारी, मंडळ अधिकारी, तलाठी व ग्रामविकास अधिकारी यांनी साइट व्हिजिट करून फोटोसेशन केले, मात्र १३ दिवस उलटून गेले तरी दुरुस्तीची कामे सुरूच झाली नाहीत, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. पालकमंत्री अजित पवार यांनी स्वतः वाहून गेलेले रस्ते व पूल तातडीने दुरुस्त करण्याच्या सूचना दिलेल्या असूनही प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केले असल्याने जिल्हा प्रशासनाला याबाबत गांभीर्य नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली.

ग्रामस्थांचा रोष : मनोहर वाणी, सखाराम घोलप, अर्जुन घोलप, संतोष वाणी, विवेक बागल, विशाल घोलप, प्रकाश ढवळे, जनार्दन वाणी, रमेश घोलप, वैजनाथ वाणी, महावीर वाणी आदी ग्रामस्थांनी पुढारी आणि अधिकारी फक्त फोटो काढून जातात, पण रस्त्याची दुरुस्ती करत नाहीत अशी संतप्त प्रतिक्रिया नोंदवली.

रस्तारोकोनंतरही आश्वासन हवेत : ५ दिवसांपूर्वी डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलन केले होते. त्यावेळी आमदार संदिप क्षीरसागर, तहसीलदार चंद्रकांत शेळके, गटविकास अधिकारी, बांधकाम विभागाचे अधिकारी, मंडळ अधिकारी जायभाये, तलाठी गणपत पोतदार व ग्रामविकास अधिकारी श्रीराम वीर यांनी २ दिवसांत तात्पुरती दुरुस्ती करून वाहतूक सुरळीत करू असे ▶ उर्वरित पान २ वर

## शांताई अर्बन बॅंकेतर्फे 'सन्मान स्त्रीशक्तीचा' उपक्रमात महिलांचा भव्य गौरव

**बीड । प्रतिनिधी**



नवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त शांताई अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेडच्या वतीने 'सन्मान स्त्रीशक्तीचा' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात विविध क्षेत्रातील उल्लेखनीय महिलांचा सन्मान करून त्यांना प्रोत्साहन देण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. सौ. दीपाताई क्षीरसागर (माजी नगराध्यक्ष, बीड), डॉ. सौ. आशाताई वर्पे (सचिव, झुंजार नारी मंच) व डॉ. सुनीता अनिल बारकूल (बारकूल हॉस्पिटल, बीड) होत्या. आपल्या भाषणात डॉ. दीपाताई क्षीरसागर म्हणाल्याक शांताई अर्बनचा हा स्त्रीशक्ती जागर उपक्रम अत्यंत कौतुकास्पद आहे. दरवर्षी असा कार्यक्रम आयोजित व्हावा, महिलांनी आपले कौशल्य ओळखून त्याचा योग्य फायदा करून घ्यावा.

डॉ. सुनीता बारकूल यांनी महिलांना मार्गदर्शन करताना सांगितले, महिलांनी आपल्या आवडीनिवडी जपाव्यात, स्वतःसाठी वेळ काढावा आणि समाजात आपले स्थान अधिक बळकट करावे. तर सौ. आशाताई वर्पे यांनी स्त्रीचे महत्व, तिचे अस्तित्व आणि कुटुंबातील भूमिकेबाबत प्रेरणादायी भाषण केले.

या कार्यक्रमात सौ. आरती परळकर (पत्रकारिता), सौ. पल्लवी परमहर्ष्टर टेकाळे (महिला उद्योजकता), डॉ. शिल्पा भोडे (वैद्यकीय सेवा), डॉ. सायली वैभव हंगे, कु. कल्याणी सावंत (महिला पोलीस), डॉ. शिल्पा पाटणसंबळ आणि इतर मान्यवर महिलांचा सन्मान करून त्यांचा प्रवास, स्वप्ने आणि अडचणी याबाबत संवाद साधण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुनीता पोपळे यांनी उत्तमरीत्या केले. ▶ उर्वरित पान २ वर